RIGHT TO INFORMATION

# राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, महाराष्ट्र, मुंबई

जुने प्रशासकीय महाविद्यालय इमारत, रु.नं.१, २, ५ व ६ हजारीमल सोमानी मार्ग,
छत्रपती शिवाजी टर्मिनससमोर, मुंबई- ४०० ००१ ०२२-२२०५७४०९/२२०७२०९७/२२८२१८१० फॅकस ०२२ २२०१८५३९
E-mail : mah-sforum@nic.in Website :- www.grahak.maharashtra.gov.in

जा.क्र.राआ/महा./आस्था/शिपाई ते लि.टं/ पदोन्नती /२०१८/१८३१ दिनांक- १० एप्रिल, २०१८

## -: कार्यालयीन आदेश :-

ग्राहक संरक्षण यंत्रणेच्या आस्थापनेवरील पदोन्नती कोटयातील लिपिक-टंकलेखक संवर्गातील खुल्या प्रवर्गातील रिक्त पदे भरण्याकरीता पदोन्नती निवड समितीच्या दिनांक ०७/०४/२०१८ रोजीच्या बैठकीमध्ये लिपिक-टंकलेखक या पदावर पदोन्नतीस पात्र ठरविण्यात आलेल्या खालील विवरणपत्रात नमूद शिपाई/रखवालदार/सफाई कामगार, गट-ड संवर्गातील आणि वेतन बँड रु.४४४०- ७४४० अधिक ग्रेड वेतन रु.१३००/- या वेतनश्रेणीतील कर्मचारी यांना लिपिक-टंकलेखक गट-क संवर्गात वेतन बँड रु. ५२००-२०२०० अधिक ग्रेड वेतन रु. १९००/- या वेतनश्रेणीतील पदावर, त्या पदाचा कार्यभार स्विकारतील त्या दिनांकापासून तात्पुरत्या स्वरुपात विभाग निहाय पदोन्नती देण्यात येत आहे.

मा.नागरी सेवा मंडळ, राज्य आयोग, मुंबई यांच्या शिफारसीनुसार खालील रकाना क्र. ६ मध्ये नमूद केल्याप्रमाणे पदोन्नतीने पदस्थापना करण्यात येत आहे.

### बृहन्मुंबई विभाग

| अ क्र | ज्ये क्र. | शिपाई कर्मचा-यांचे नांव | विभागाचे नांव | सद्याचे कार्यालय | लिपिक-टंकलेखक या पदावर पदोन्नतीने पदस्थापना दिलेले ठिकाण |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | ३ | श्री.बा.अ. गायकवाड | बृहन्मुंबई | राज्य ग्राहक आयोग, मुंबई | राज्य ग्राहक आयोग, मुंबई |
| **बृहन्मुंबई बाहेरील विभाग** | | | | | |
| १ | २ | श्री.रा.ना. पठाडे | औरंगाबाद | जिल्हा ग्राहक मंच, परभणी | राज्य आयोगाचे परिक्रमा खंठपीठ औरंगाबाद |
| २ | ८ | श्री.डी.एन. केनेकर | औरंगाबाद | जिल्हा ग्राहक मंच,हिंगोली | जिल्हा ग्राहक मंच, जालना |
| ३ | १५ | श्री.अ.आ. खरपकर | नागपूर | जिल्हा ग्राहक मंच, अति.नागपूर | राज्य आयोगाचे परिक्रमा खंठपीठ नागपूर |

(कृ.मा.प)

वरील कर्मचा-याचे कामकाज असमाधानकारक वाटल्यास त्यांना कोणतीही मौखिक अथवा लेखी सूचना न देता कोणत्याही वेळी पदावनत करण्यात येईल.

प्रबंधक, राज्य आयोग/जिल्हा ग्राहक मंच, परभणी/हिंगोली/अति.नागपूर यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी आपल्या स्तरावर पदोन्नत कर्मचा-यांना पदोन्नतीच्या पदावर रुजु होण्यासाठी तात्काळ कार्यमुक्त करावे. तसेच प्रबंधक, राज्य आयोग,परिक्रमा खंडपीठ, नागपूर/औरंगाबाद व प्रबंधक, जिल्हा ग्राहक मंच, जालना यांनी पदोन्नत कर्मचा-यांना पदोन्नतीच्या पदावर रुजु करुन घेवुन त्याबाबतचा अहवाल या कार्यालयास तात्काळ सादर करावा.

सदर आदेश या कार्यालयाच्या www.grahak.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आले असल्यामुळे, सदर आदेशाच्या अनुषंगाने उपरोक्त कर्मचा-यांना कार्यमुक्त करणे अथवा हजर करुन घेण्याबाबत संकेत स्थळावरील प्रत ग्राहय धरण्यात यावी.

(स.ज्ञा.पवार)
प्रबंधक (प्रशासन)
राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग,
महाराष्ट्र, मुंबई

प्रति,

१. श्री.बा.अ.गायकवाड, शिपाई ,राज्य आयोग, मुंबई
२. श्री.रा.ना.पठाडे, शिपाई, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच, परभणी
३. श्री.डी.एन.केनेकर, शिपाई, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच, हिंगोली
४. श्री. अ.आ.खरपकर, शिपाई, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच, अति.नागपूर

प्रतिलिपी

१. प्रबंधक(विधी), राज्य आयोगाचे परिक्रमा खंडपीठ, औरंगाबाद/ नागपूर
२. प्रबंधक, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच, परभणी/हिंगोली/अति.नागपूर
३. अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई
४. जिल्हा कोषागार कार्यालय मार्फत संबंधित जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच
५. राज्य आयोग, मुंबई आस्थापना/लेखा शाखा
६. वैयक्तिक नस्ती (संबंधित कर्मचारी)